# ॥ श्री शिवस्तुति ॥

कैलासराणा शिवचंद्रमौळी । फणींद्र माथां मुकुटीं झळाळी ।
कारुण्यसिंधू भवदुःखहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ १॥

रवींदु दावानल पूर्ण भाळीं । स्वतेज नेत्रीं तिमिरौघ जाळी ।
ब्रह्मांडधीशा मदनांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ २॥

जटा विभूती उटि चंदनाची । कपालमाला प्रित गौतमीची ।
पंचानना विश्वनिवांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ३॥

वैराग्ययोगी शिव शूलपाणी । सदा समाधी निजबोधवाणी ।
उमानिवासा त्रिपुरांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ४॥

उदार मेरू पति शैलजेचा । श्रीविश्वनाथ म्हणती सुरांचा ।
दयानिधी जो गजचर्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ५॥

ब्रह्मादि वंदी अमरादिनाथ । भुजंगमाला धरि सोमकांत ।
गंगा शिरीं दोष महाविदारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ६॥

कर्पूरगौरीं गिरिजा विराजे । हळाहळे कंठ निळाचि साजे ।
दारिद्र्यदुःखें स्मरणें निवारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ७॥

स्मशानक्रीडा करितां सुखावे । तो देवचूडामणि कोण आहे ।
उदासमूर्तीं जटाभस्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ८॥

भूतादिनाथ अरिअंतकाचा । तो स्वामि माझा ध्वज शांभवाचा ।
राजा महेश बहुबाहुधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ९॥

नंदी हराचा हर नंदिकेश । श्री विश्वनाथ म्हणती सुरेश ।
सदाशिव व्यापक तापहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ १०॥

भयानक भीम विक्राळ नग्न । लीलाविनोदें करि काम भग्न ।
तो रुद्र विश्वंभर दक्ष मारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ११॥

इच्छा हराची जग हें विशाळ ।पाळी रचीतो करि ब्रह्मगोळ ।
उमापती भैरव विघ्नहारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१२॥

भागीरथीतीर सदा पवित्र ।जेथें असे तारक ब्रह्ममंत्र ।
विश्वेश विश्वंभर त्रिनेत्रधारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१३॥

प्रयाग वेणी सकळा हराच्या ।पादारविंदीं वहाती हरीच्या ।
मंदाकिनी मंगल मोक्षकारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१४॥

कीर्ती हराची स्तुति बोलवेना ।कैवल्यदाता मनुजां कळेना ।
एकाग्रनाथ विष अंगिकारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१५॥

सर्वांतरीं व्यापक जो नियंता ।तो प्राणलिंगाजवळी महंता ।
अंकीं उमा ते गिरिरूपधारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१६॥

सदा तपस्वी असे कामधेनू ।सदा सतेज शशि कोटिभानू ।
गौरीपती जो सदा भस्मधारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१७॥

कर्पूरगौर स्मरल्या विसांवा ।चिंता हरी जो भजकां सदैवा ।
अंतीं स्वहीत सुचना विचारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१८॥

विराम काळीं विकळ शरीर ।उदास चित्तीं न धरीच धीर ।
चिंतामणी चिंतनें चित्तहारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१९॥

सुखावसाने सकळें सुखाचीं ।दुःखावसाने टळती जगाचीं ।
देहावसानें धरणी थरारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२०॥

अनुहातशब्द गगनीं न माय ।त्याचेनि नादें भव शून्य होय ।
कथा निजांगें करुणा कुमारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२१॥

शांति स्वलीला वदनीं विलासे ।ब्रह्मांडगोळीं असुनी न दीसे ।
भिल्ली भवानी शिव ब्रह्मचारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२२॥

पीतांबरें मंडित नाभि ज्याची ।शोभा जडीत वरि किंकिणीची ।
श्रीदेवदत्त दुरितांतकारी ।तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२३॥

जिवाशिवांची जडली समाधी । विटला प्रपंच तुटली उपाधी ।
शुद्धस्वरें गर्जति वेद चारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ २४ ॥

निधानकुंभ भरला अभंग । पहा निजांगें शिव ज्योतिलिंग ।
गंभीर धीर सुरचक्रधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ २५ ॥

मंदार बिल्वें बकुलें सुवासी । माला पवित्र वहा शंकरासी ।
काशीपुरीं भैरव विश्व तारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ २६ ॥

जाई जुई चंपक पुष्पजाती । शोभे गळां मालतिमाळ हातीं ।
प्रतापसूर्य शरचापधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ २७ ॥

अलक्ष्यमुद्रा श्रवणीं प्रकाशे । संपूर्ण शोभा वदनीं विकासे ।
नेई सुपंथें भवपैलतीरीं । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ २८ ॥

नागेशनामा सकळां जिव्हाळा । मना जपें रे शिवमंत्रमाळा ।
पंचाक्षरी ध्यान गुहाविहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ २९ ॥

एकांति ये रे गुरुराज स्वामी । चैतन्यरूपीं शिव सौख्यनामीं ।
शिणलों दयाळा बहुसाल भारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ३० ॥

शास्त्राभ्यास नको श्रुती पढुं नको तीर्थांसि जाऊं नको ।
योगाभ्यास नको व्रतें मख नको तीव्रें तपें तीं नको ॥

काळाचें भय मानसीं धरुं नको दुष्टांस शंकूं नको ।
ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको ॥

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated February 13, 1999